A

DICTIONARY OF SANSCRIT ROOTS,

IN

SANSCRIT AND MARÁṬHÍ

(With a list of common roots and an Appendix)

PREPARED

BY

VISHṆU PARASHURÁM SHÁSTRÍ
PAṆḌIT.

Bombay:

PRINTED, PUBLISHED AND SOLD

AT

THE "INDU-PRAKASH" PRESS.

1865.

(Registered under Act XX of 1847.)

(Right of Translation Reserved.)

Price Rupees 2½.

Digitized by Google

संस्कृत आणि महाराष्ट्र धातुकोश.

हा ग्रंथ

(प्रसिद्ध संस्कृत धातुकोश व परिशिष्ट यांसहित)

संस्कृत व इंग्लिश ग्रंथांच्या आधारें

विष्णु परशुराम शास्त्री पंडित

यांनीं केला,

तो

मुंबईत



"इंदुप्रकाश" छापखान्यांत छापिला.

सन १८६५.

हें पुस्तक १८४७ चा अक्ट २० प्रमाणें नोंदलें आहे.

भाषांतराचा हक्क ग्रंथकारानें ठेविला आहे.

किंमत अडीच रुपये.

Digitized by Google

Digitized by Google

संस्कृत आणि महाराष्ट्र धातुकोश.

हा ग्रंथ

(प्रसिद्ध संस्कृत धातुकोश व परिशिष्ट यांसहित)

संस्कृत व इंग्लिश ग्रंथांच्या आधारें

विष्णु परशुराम शास्त्री पंडित

यांनीं केला,

तो



मुंबईत

"इंदुप्रकाश" छापखान्यांत छापिला.

सन १८६५.

हें पुस्तक १८४७ चा अक्ट २० प्रमाणें नोंदलें आहे.

भाषांतराचा हक्क ग्रंथकारानें ठेविला आहे.

किंमत अडीच रुपये.

Digitized by Google

Digitized by Google

TO

SIR ALEXANDER GRANT BART, LL.D.,

DIRECTOR OF PUBLIC INSTRUCTION, BOMBAY,
LATE VICE CHANCELLOR OF THE BOMBAY UNIVERSITY
AND PRINCIPAL OF THE ELPHINSTONE COLLEGE,

In token of respect for his successful exertions in securing
for the Sanscrit language a prominent place
in the list of the subjects of the
University,

This humble work is dedicated

WITH HIS PERMISSION,

BY

THE AUTHOR.

Digitized by Google

Digitized by Google

मेहर्बान सर अलेक्जांडर ग्रांट,

बारोनेट, एल् एल्. डी.

डैरेक्टर आफ् पब्लिक इन्स्ट्रक्शन,

मुंबई यूनिवर्सिटीचे माजी वैस चान्सेलर

आणि

एल्फिन्स्टन कालेजाचे माजी प्रिन्सिपाल

यांस,

त्यांनीं संस्कृत भाषेची योग्यता जाणून तिचें परिगणन मुंबई
यूनिवर्सिटीच्या विषयांत करण्याकरितां श्रम करून
यश मिळविलें हें जाणून ग्रंथकारानें मोठ्या
कृतज्ञतेनें व आदरानें

हा ग्रंथ

त्यांच्या हुकमानें नजर केला असे.

Digitized by Google

Digitized by Google

मेहर्बान सर अलेक्जांडर ग्रांट,

बारोनेट, एल् एल्. डी.

डैरेक्टर आफ् पब्लिक इन्स्ट्रक्शन,

मुंबई यूनिवर्सिटीचे माजी वैस चान्सेलर

आणि

एल्फिन्स्टन कालेजाचे माजी प्रिन्सिपाल

यांस,

त्यांनीं संस्कृत भाषेची योग्यता जाणून तिचें परिगणन मुंबई
यूनिवर्सिटीच्या विषयांत करण्याकरितां श्रम करून
यश मिळविलें हें जाणून ग्रंथकारानें मोठ्या
कृतज्ञतेनें व आदरानें

हा ग्रंथ

त्यांच्या हुकमानें नजर केला असे.

Digitized by Google

Digitized by Google

PREFACE.

THE learned of the old school of India are of opinion that the knowledge of Sanscrit is day by day deteriorating without a parallel; but the author of this work sees no ground to heed it and considers the present, on the contrary, to be an age destined for a speedy revival of Sanscrit literature. It has under the present *regime* much brighter prospects than before. Its claims in all the Indian Universities have been authoritatively admitted. Its diffusion will have soon to cross its long destined undue bounds, and thus it will be more general than before. Although it needs be admitted that men versed in particular branches of Sanscrit learning will not be so often met with as before, yet the general acquaintance of the language will undoubtedly be more common and the Oriental method of learning that language will shortly be succeeded by the more improved Western one.

No want under the present circumstances is felt more keenly by the student who learns the Sanscrit language according to the Western method adopted at present in Colleges and Schools than that of a Dictionary which gives the meanings of the Sanscrit words in English or Maráthí. The publications of this kind are exceedingly few and costly and even copies of these are hardly obtainable. The student who studies Sanscrit according to the ancient method will not feel this want or the want of any book of reference very much, since in the beginning of his studies he is compelled to learn at least one perhaps more koshas or strings of synonyms by heart. In the same manner he has to master subsequently all the works with which he has to deal. In fact if he attains any great degree of proficiency he must become a living library and of what use is to such a man a book of reference? It is different with the pupil who in conformity with the European method has to read books such as the Hitopadesh, the Kávyas and the Nátakas after having obtained a superficial acquaintance with the rudiments of grammar. Step by step, lesson by lesson, he has to

Digitized by Google

acquire knowledge of nouns, of verbal roots &c. and to penetrate the luxurious growth of verbal forms. He is constantly driven to seek for help from books of reference whether grammars or dictionaries until the whole of the words, roots and grammatical forms have been impressed upon his mind.

With a view to provide somewhat for this want the author presents to the public the subjoined Sanscrit and Mahárástra Dhatu-kosh and a Prasiddha Sanscrit Dhatu-kosh with an appendix. This is in other words a dictionary of Sanscrit roots which amount to about 2500 in all and form as their name signifies the ground-work of that language.

VISHNU PARASHURÁM SHÁSTRI
PANDIT.

Bombay, 21st September 1865.

Digitized by Google

INTRODUCTION.

No task is more difficult and troublesome than to lay hand upon a certain root even when its entire form is known, in particular sections called *ganas* or conjugations, while in this work all the roots that are similar in form are seen at once one after another on account of the alphabetical order which is peculiarly suited for this purpose. In addition to this advantage this dictionary presents at once most easily and conveniently to the view of the student roots in the most regular order with their respective adjuncts, conjugations, meanings and derivatives.

In order to make the work equally serviceable in all countries wherever the Sanscrit language is zealously cultivated the meaning of roots is given in Sanscrit as well as in Marathi, the latter being for the special convenience of the inhabitants of this part of India.

The arrangement adopted in writing roots is as follows :—

1*st.*—The roots deprived of their indicatory letter or letters are printed in large type.

2*ndly.*—The indicatory letter or letters are shown in parenthesis. Among these indicators some vowels are printed with a horizontal line below or perpendicular one above to show that they are respectively *anudatta* or *swarita*, whilest a vowel without a line must be understood to be *udatta*. The adjunct *udatta* अ chiefly serves the purpose of an easy pronunciation and of counteracting the doubt to which the rules of *sandhi* or permutation lead.

3*rdly.*—The number added shows the class or conjugation of the root.

4*thly.*—The letters प. आ. or उ. show that the root is respectively *parasmaipadi*, *átmanepadi* or *ubhayapadi*, *i. e.* to be inflected in both voices.

5*thly.*—Next follow the meaning or meanings of the root in sanscrit.

6*thly.*—The same in Maráthí with numbers of different meanings.

Digitized by Google

Lastly one two or more examples of the present tense, the third or in the language of the Sanscrit grammarians the first person singular of the verb and one or two examples of *kridant* or verbal derivatives if any words of note are derived from the root.

The roots that are most commonly met with are at the suggestion of Dr. G. Bühler, given separately in a portion styled the "Prasiddha Sanscrit Dhátu-Kosh," generally with their numbers of conjugations and five examples. Viz.

I.—Present tense	1st Person	singular	number.
II.—First Past tense or reduplicated perfect	Do.	Do.	Do.
III.—First Future	Do.	Do.	Do.
IV.—Second Future	Do.	Do.	Do.
V.—Third Past tense or aorist	Do.	Do.	Do.

Examples of dual and plural and of other persons than the first are given where they are not formed according to the general rules. Also examples of past participles and the gerund are given on similar occasions. Roots in this portion can easily be identified in the general dictionary either from the numbers of conjugations or from the example of the present tense, first person, singular.

To enable the student to understand the most complex machinary of conjugations &c. extensive and elaborate tables of compound roots, *Sautra* roots, affixes, different conjugations &c. &c. have been appended at the end of the work. Also some of the principal changes which affect the forms of verbs in different tenses and moods with the rules which regulate those changes, have briefly been noticed in the appendix.

The works chiefly consulted in the preparation of this work are Bhattoji Díxit's Siddhant Kaumudi, H. H. Wilson's Dictionary and N. L. Westergaard's *Radices Linguæ Sanscrit.* In conclusion the author begs to tender his hearty thanks to Dr. G. Bühler for his kind suggestions and assistance received in the prepation of this work.

V. P. S. P.

Digitized by Google

उपोद्घात.

कौमुदीमध्यें अथवा धातुपाठामध्यें अमुकच धातु पाहूं म्हटल्यास लवकर सांपडत नाहीं. याकरितां या कोशांत वर्ण क्रमानें विल्हेवार धातु लिहिले आहेत, त्यामुळें पाहिजे तेव्हां पाहिजे तो धातु सांपडण्यास हा कोश फार उपयोगी पडेल. याशिवाय या कोशापासून प्रत्येक धातूचे अनुबंध, गण, अर्थ आणि त्या धातूपासून झालेले कांहीं शब्द हे वाचणारांस एकदम समजतील.

जेथें जेथें संस्कृत भाषेचा अभ्यास होत असेल तेथें सर्वत्र या ग्रंथाचा एकसारखा उपयोग व्हावा म्हणून धातूंचा अर्थ संस्कृत भाषेंत दिला आहे; आणि महाराष्ट्र देशांतील लोकांच्या विशेष उपयोगाकरितां मराठींत ही अर्थ दिला आहे.

धातु लिहिण्याची व्यवस्था खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविली आहेः—

१. प्रथमतः अनुबंधरहित धातु मोठ्या अक्षरानें छापला आहे.

२. त्यापुढें कंसामध्यें अनुबंध दाखवले आहेत. यांजपैकीं स्वरूप अनुबंध अनुदात्त व स्वरित असल्यास ते यथाक्रम खालीं अडवा व वर उभा असे स्वर देऊन दाखविले आहेत. ज्या स्वरानुबंधास स्वर मुळींच नाहीं तो उदात्त जाणावा. हा उदात्त स्वर अ असल्यास त्याचा उपयोग मुख्यत्वेंकरून इतकाच अ-

Digitized by Google

सतो कीं धातूचा उच्चार सहज करितां यावा आणि त्याच्या शेवटच्या व्यंजनास संधिकार्य होऊन त्याच्या वास्तव स्वरूपाविषयीं संशय पडूं नये.

३. पुढें गणद्योतक अंक घातला आहे.

४. त्यापुढें प. आ. किंवा उ. हीं अक्षरें लिहिलीं आहेत त्यांवरून धातु यथाक्रम परस्मैपदी, आत्मनेपदी अथवा उभयपदी आहे असें समजावें.

५. त्यापुढें संस्कृत भाषेंत अर्थ लिहिला आहे.

६. पुढें मराठी भाषेंत अर्थ लिहिला आहे. अनेक अर्थ असल्यास पूर्वी अंक घालून ते निरनिराळे दाखवले आहेत.

७. शेवटीं वर्तमानकाळीं प्रथमपुरुषाच्या एकवचनाचें व प्रासिद्ध असल्यास धातुसाधित कृदंताचें एक अथवा अनेक उदाहरणें दिलीं आहेत.

संस्कृत वैय्याकरणांनीं एकंदर सुमारें २५०० धातु सांगितले आहेत त्यांपैकीं कांहीं धातूंचे प्रयोग फार आढळतात. त्यावरून पाहतां फार प्रासिद्ध धातु असे थोडेच आहेत. ते डाक्तर जी. बुल्हर यांच्या सूचनेवरून या ग्रंथांत एक "प्रासिद्ध संस्कृत धातु कोश" नांवाचा भाग करून त्यांत वर्ण क्रमानें लिहिले आहेत. गणद्योतक अंकावरून व प्रथम पुरुषाच्या उदाहरणावरून हे धातु पहिल्या कोशांत सहज सांपडतील.

प्रासिद्ध संस्कृत धातुकोशांत शब्द लिहिण्याची व्यवस्था खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविली आहे:—

प्रथम अनुबंधरहित धातु; क्वचित् स्थलीं विशेष कारण असल्यास कंसांत अनुबंध; पुढें गणद्योतक अंक; त्यापुढें त्या धातूचीं वर्तमान, परोक्षभूत, अनद्यतनभविष्य, भविष्य व भूत या काळांचीं प्रथमपुरुषाच्या एकवचनाचीं रूपें दिलीं आहेत; शेवटीं साधारण नियमास अनुसरून नसणारें तप्रत्य-

Digitized by Google

यांत विशेषण, त्वा अथवा य प्रत्ययांत पूर्वकालवाचक अव्यय आणि तुमुं प्रत्ययांत हेत्वर्थक अव्यय हींही स्थलविशेषीं दिलीं आहेत. जेव्हां एकच रूप दोन प्रकारचें होतें तेव्हां तीं दोन्ही एकाखालीं एक लिहून वरच्या रूपापुढें विरामचिन्ह मुळींच नकारितां खालच्यापुढें अर्धविरामचिन्ह केलें आहे. जेव्हां एकच रूप तीन, चार, अथवा पांचप्रकारचें होतें तेव्हां तीं दोन अथवा तीन ओळींत मिळून लिहिलीं आहेत व त्या प्रत्येकाच्या पुढें स्वल्पविरामचिन्ह केलें आहे. जेव्हां एकच धातु दोन अथवा अधिक गणांत आढळतो तेव्हां त्याच्यापुढें तितक्या गणांचे अंक घालून त्यांचीं भिन्न भिन्न प्रकारें होणारीं रूपें मात्र अर्धविरामचिन्हानें ताडून निरनिराळीं दाखविलीं आहेत. बाकीचीं एकत्रच दाखविलीं आहेत.

निरनिराळ्या कालाचीं व अर्थाचीं धातुरूपें चालवणें विद्यार्थ्यांस फार कठीण पडतें तें सोपें करण्याकरतां दहा गणांतल्या परस्मैपदी व आत्मनेपदी धातुरूपांचीं विस्तीर्ण कोष्टकें ग्रंथाच्या शेवटीं परिशिष्टांत दिलीं आहेत. याशिवाय ही सौत्रधातु, धातूंहून होणारे प्रत्यय इत्यादिकांचीं कोष्टकें दिलीं आहेत. याखेरीज निरनिराळ्या काळीं धातूच्या स्वरूपांत होणारे फेरफार व ते ज्या सूत्रांनीं होतात तीं सूत्रें हीं थोडयोडीं प्रसंगानुसार लिहिलीं आहेत.

हा ग्रंथ तयार करतांना मूख्यत्वेंकरून भट्टोजी दीक्षितकृत सिद्धांत कौमुदी, विल्सनचा संस्कृत कोश व वेस्टर्गार्ड याचा धातुपाठ ह्या ग्रंथांची मदत घेतली आहे. हा ग्रंथ तयार होत असतां डाक्टर जी. बुल्हर यांनीं ज्या सूचना व मदत केली त्यांबद्दल ग्रंथकर्ता त्यांचा आभारी आहे.

मुंबई, ता. २१
सप्टेंबर १८६५

वि. प. शा. पं.

Digitized by Google

Digitized by Google

ABBREVIATIONS.

संक्षेपचिन्हें.

आ. आत्मनेपदी.	पू. पूर्वकालवाचक धातुसाधित अव्यय.
आशी० आशीर्वादार्थी	
इ० इत्यादि.	प्र. प्रथम पुरुष.
उ. उभयपदी.	प्रव. प्रवर्त्तनाद्यर्थी.
उ० उदाहरण.	ब. बहुवचन.
ए. एकवचन.	म. मध्यमपुरुष.
द्वि. द्विवचन.	वि. विशेषण.
प. परस्मैपदी.	हे. हेत्वर्थक अव्यय.

Digitized by Google

Digitized by Google

अनुक्रमणिका.

विषय.	पृष्ठ.
संस्कृत आणि महाराष्ट्र धातुकोश.	१
प्रसिद्ध संस्कृत धातुकोश.	१६१
परिशिष्ट.	१
धातु व त्यांजपासून होणारे शब्द याविषयीं विचार.	२
साधितधातूंचें कोष्टक (१)	४
सौत्रधातु, कोष्टक (२)	६
अनुबंध म्हणजे इत्संज्ञक वर्ण यांचीं कार्यें.	८
दशलकारांचे प्रसिद्ध काळ व अर्थ, कोष्टक (३)	१२
दशलकारांविषयीं विचार	१३
विकरण विचार.	१७
अनुदात्त धातूंचें कोष्टक (४)	१८
लकारांच्या स्थानीं होणाऱ्या आदेशांचें कोष्टक(५)	२०
अकरागण, कोष्टक (६)	२१
दहागणांतल्या धातूंच्या रूपांची कोष्टकें(७—१६)	२५
उपसर्ग विचार.	५७
व्याकरणाभ्यासाच्या आवश्यकतेविषयीं श्लोक.	५९

Digitized by Google

Digitized by Google

संस्कृत आणि महाराष्ट्र धातुकोश.

अक्, (अ. मू.) १. प. कुटिलायां गतौ. वांकडें चालणें. अकति.

अक्, (इ) १. आ. लक्षणे. खूण—चिन्ह करणें. अंकते; अंक.

अंक, १०. उ. पदे, लक्षणे. पायाचा व्यापार करणें, जाणें. २ खूण— चिन्ह करणें. ३ मांडीवर घेणें. अंकयति, अंकयते.

अग्, (अ. मू) १. प. कुटिलायां गतौ. वांकडें चालणें. अगति.

अग्, (इ) १. प. गत्यर्थे. जाणें. अंगति; अंग.

अगद, ११. प. नीरोगत्वे. निरोगी असणें. अगदयति; अगद.

अंग, १०. उ. अंक पाहा. अंगयति, अंगयते.

अघ्, (इ) १. आ. मघ् गत्याक्षेपे पाहा. अंघते.

अच्, (उं) १. उ. अंच् गतियाचनेषुपाहा. अचति, अचते.

अच्, (इं) १. उ. अंच् गतियाचनेषु पाहा. अंचति, अंचते.

अंच्, (उं) १. उ. गतियाचनेषु. जाणें. २ याचना करणें. अंचति, अंचते; प्राची, प्रतीची.

अंच्, (उ) १. प गतिपूजनयोः. जाणें. २ पूजिणें. अंचति.

अंच्, (उ) १०. उ. विशोषणे. विशोष—भेद दाखवणें. अंचयति, अंचयते.

अज्, (अ) १. प. गतिक्षेपणयोः. जाणें. २ टाकणें, फेंकणें. अजति

Digitized by Google

अञ्ज्, (इ.) १०. उ. भाषायां बोलणें. अंजयति, अंजयते; व्यंजयति; व्यंजना.

अंज्, (ऊ) ७. प. व्यक्ति म्रक्षण कांति गतिषु. स्पष्ट—व्यक्त करणें. २ तेललावणें, माखणें. ३ चमकणें, तेजस्वी दिसणें. ४ जाणें. अनक्ति; अंजन.

अट्, (अ) १. प. गतौ, जाणें. अटति; अटन.

अट्, (इ) १. आ. गतौ. जाणें. अंटते.

अट्ट्, (अ.) १०. उ. अनादरे. अनादर—अपमान करणें. अट्टयति, अट्टयते; अट्ट.

†अट्ट्, (अ) १. आ. अतिक्रमण हिंसयोः. अतिक्रम करणें. २ हिंसा करणें. अट्टते; अट्टन.

अड्, (अ) १. प. उद्यमे. उद्योग—खटपट करणें. अडति.

*अंड्, (अ) १. प. अभियोगे. चालून जाणें. २ पराभव करणें. ३ फिर्याद करणें. अण्डति.

अण्, (अ) १. प. शब्दे. शब्द करणें. अणति; आणि.

अण्, (अ) ४. आ. प्राणने. वांचणें. २ बलवान् होणें. अण्यते.

अत्, (अ) १. प. सातत्य गमने. निरंतर चालणें—संचार करणें. अतति; आत्मा.

अत्, (इ) १. प. बंधने. बांधणें. अंतति; अंत.

अद्, (इ) १. प. बंधने. बांधणें. अंदति; अंदू.

अद्, (अ) २. प. भक्षणे. खाणें, भक्षणें. अत्ति; अन्न.

अंध, १०. उ. दृष्ट्युपघाते, दृष्ट्युपसंहारे. डोळे फोडणें, दृष्टिनाश करणें. २ डोळे मिटणें—झांकणें. अंधयति, अंधयते; अंध.

अन्, (अ) २. प. प्राणने. वांचणें. २ बलवान् होणें. अनिति; प्राण.

†अट्, ट् अथवा अत्, ट् असा आहे.
* अड्, ड् असा आहे.

Digitized by Google

अन्, (अ) ४. आ. प्राणने. वांचणें. २ बलवान् होणें. अन्यते.

अब्, (इ) १. आ. शब्दे, गतौ. शब्द करणें, बोलणें २. जाणें. अंबते; अंब.

अंबर, ११. प. संभरणे. पुष्कळ– समृद्धि करणें, जमवणें. अंबर्यति; अंबर.

अभ्, (इ) १. आ. अब् पाहा. अंभते; अंभस्.

अभ्र, (अ) १. प. गत्यर्थे. जाणें. अभ्रति; अभ्र.

अम्, (अ) १. प. गतिशब्दसंभक्तिषु. जाणें. २ शब्द करणें. ३ सेवा करणें; चिकटून–लागून असणें. अमति; अमस.

अम्, (अ) १०. उ. रोगे. अजार होणें–करणें. आमयति, आमयते; आमय.

अय्, (अ) १. आ. गतौ. जाणें. अयते, पलायते; उदय.

अरर, ११. प. आराक्रमणि. आरीनें काम करणें. ह्र. आरीनें कातडें कापणें. २ चाबकाच्या मागची आरटोचणें. अरर्यति.

अर्क्, (अ) १०. उ. स्तवने, तपनेच. स्तुतिकरणें. २ तपणें, उष्णता करणें. अर्कयति, अर्कयते; अर्क.

अर्घ्, (अ) १०. उ. मूल्ये. किंमत पडणें. अर्घयति, अर्घयते; समर्घ, महार्घ.

अर्च्, (अ) १. प. पूजायां. पूजिणें. अर्चति; अर्चा.

अर्च्, (अ) १०. उ. पूजायां. पूजिणें. अर्चयति, अर्चयते.

अर्ज्, (अ) १. प. अर्जने. आर्जव–प्रार्थना करणें. अर्जति; उपार्जना.

अर्ज्, (अ) १०. उ. प्रतियत्ने, संपादनेच. तयार करणें २ उलट उद्योग करणें. ३ मिळवणें, संपादणें. अर्जयति, अर्जयते.

अर्थ, १०. आ. उपयाञ्ञायां. मागणें, याचणें. अर्थयते; प्रार्थना.

Digitized by Google

अर्द्, (अ) १. प. गतौ, याचने. जाणें. २ मागणें. अर्दति; अर्दन.

अर्द्, (अ) १०. उ. हिंसायां. मारणें, ताडन करणें. अर्दयति, अर्दयते.

अर्ब्, (अ) १. प. गतौ. जाणें. अर्बति.

अर्व्, (अ) १. प. हिंसायां. मारणें. अर्वति.

अर्ह्, (अ) १. प. पूजायां. पूजा करणें. २ पूजेस योग्य होणें. अर्हति; अर्ह.

†अर्ह्, (अ) १०. उ. मागला शब्द पाहा. अर्हयति, अर्हयते; अर्हणा.

अल्, (अ) १. प. उं*. भूषण पर्याप्ति वारणेषु. शोभवणें. २ पुरे करणें. ३ वारण करणें. अलति, अलते; अलं, अलंकार.

अव्, (अ) १. प. रक्षण, गति, कांति, प्रीति, तृप्ति, अवगम, प्रवेश, श्रवण, स्वाम्यर्थ, याचन, क्रिया, इच्छा दीप्ति, अवाप्ति, आलिंगन, हिंसा, दान, भाग, वृद्धिषु. राखणें. २ जाणें. ३ शोभणें. ४ प्रीतिकरणें. ५ संतोषवणें. ६ जाणणें. ७ शिरणें. ८ ऐकणें. ९ स्वामित्व करणें. १० मागणें. ११ करणें. १२ इच्छिणें. १३ प्रकाशणें. १४ पावणें. १५ आलिंगन करणें. १६ हिंसा करणें. १७ देणें. १८ भाग करणें. १९ वाढवणें, वृद्धिकरणें. अवति; अवनी.

अवधीर, १०. उ. अवधीरणे. तिरस्कार करणें. अवधीरयति, अवधीरयते.

अश्, (उ) ५. आ. व्याप्तौ, संघाते. व्यापणें. २ जमणें. अश्नुते; आशित्र.

अश्, (अ९. प. भोजने).

† णिच्प्रत्यय विकल्पानें होण्यासाठीं १० व्या गणांत याचा पाठ दोनवेळ केला आहे.

* उभयपदी असें कोणी म्हणतात.

Digitized by Google

खाणें, जेवणें. अश्नाति; अशन, प्राशन.

अष्, (अं) १. उ. अस् गतिदीप्त्यादानेषुपाहा. अषाति, अषते.

अस्, (अं) १. उ. गतिदीप्त्यादाने षु. जाणें. २ चमकणें. ३ घेणें. असति, असते; असिक.

अस्, २. प. भुवि. असणें. अस्ति; अस्तित्व, आस्तिक.

अस्, (उ) ४. प. क्षेपणे. फेकणें, टाकणें. अस्यति; आसि.

अस, ११. प. उपतापे. रोगअजार होणें. अस्यति.

असु, ११. प. } असु ११. पाहा.
असू, (ऊ) ११. उ. } असूयति, असूयते; असूया.

अस्, (इ) १०. उ. अज्, भाषायां पाहा. अंसयति, अंसयते; अंसाति.

अंस, १०. उ. समाघाते. विभाग करणें, अंसयति, अंसयते; अंस.

अह्, (इ) १. आ. गतौ. जाणें. अंहते; अंहति.

अँह्, (अ) ५. प. व्याप्तौ. व्यापणें. अन्होति; अहन्.

अह्, (इ) १०. उ. अज् भाषायां पाहा. अंहयति, अंहयते.

अक्ष्, (ऊ) १. प. व्याप्तौ. व्यापणें. अक्षति; अक्ष.

आ.

आछ्, (इ) १. प. आयामे. विस्तार करणें, लांबवणें, लांब करणें. आंछति.

आंदोल, १०. उ. आंदोलने. आंदोळणें, झोकादेणें. आंदोलयति, आंदोलयते; आंदोलन.

आप्, (लृ) ५. प. व्याप्तौ. व्यापणें. आप्नोति; व्याप, व्याप्ति.

आप्, } (लृ) १०. उ.
आप् } (लृ) १०. उ. लंभनें.

---

* आ धातूचा प्रयोग प्रायः वेदांतच होतो.

Digitized by Google

पावणें, प्राप्तहोणें. आपयति, आपयते; प्राप्ति.

आस्, (अ) २. आ. उपवेशने. बसणें. आस्ते; आसन.

इ.

इ, १. प. गतौ. जाणें. अयति.

ई*, (इ) २. आ. अध्ययने. अध्ययन करणें, पढणें, शिकणें. अधीते; अध्ययन.

इ, (णृ) २. प. गतौ. जाणें. एति; प्रेत.

इख्, (अ) १. प. गत्यर्थे. जाणें, चालणें. एखति.

इख्, (इ) १. प. इख् (अ) पाहा. इंखति.

इग्, (इ) १. प. इख् (अ) पाहा. इंगति; ईंगित.

इट्, (अ) १. प. इख् (अ) पाहा. एटति.

इद्, (इ) १. प. परमैश्वर्ये मोठें ऐश्वर्य पावणें. इंदति; इंद्र.

इंध्, (त्रि. ई) ७. आ. दीप्तौ. पेटणें, प्रदीप्त होणें. इंध्ये; इंधन.

इर्, (अ. ऋ) ११. उ. ईर्ष्यायां. एखादा गुण दुसऱ्या पेक्षां अधिक संपादण्याची इच्छा धरणें. २. हेवा करणें. ईर्यति, ईर्ये.

इरज्, ११. प. इर् पाहा. इरज्यति.

इरस्, ११. प. इर् पाहा इरस्यति.

इल्, (अ) ६. प. स्वप्नक्षेपणयोः· स्वप्न पडणें. २ फेंकणें. इलति.

इल्, (अ) १०. उ. प्रेरणे. प्रेरणा करणें, चेव आणणें. एलयति, एलयते.

इला, ११. प. विलासे. विलास—ऐषआराम करणें. इलायति.

इव्, (इ) १. प. व्याप्तौ. व्यापणें. इन्वति.

इवस्, ११. प. परिताप परिचरणयोः· चोहोंकडून सं-

*याचा प्रयोग अधि हा उपसर्ग लागूनच होतो.

Digitized by Google

ताप होणें. २ सेवा करणें. इवस्यति.

इष्, (अ) ४. प. गतौ. जाणें. इष्यति. इषा.

इष्, (अ) ६. प. इच्छायां. इच्छिणें, इच्छा करणें. इच्छति.

इष्, (अ) ९. प. आभीक्ष्ण्ये. वारंवार करणें. २ अत्यंत पराकाष्ठेचा करणें. इष्णाति.

इषुध, ११. प. शरधारणे. बाण—तीर धारण करणें. इषुध्यति.

ई.

ई, १. प. गतौ. जाणें. अयति.

ई, २. प. गतिव्याप्तिप्रजन कांत्यसनखादनेषु. जाणें. २ कापणें. ३ गर्भ ग्रहण—धारण करणें. ४ इच्छा करणें. ५ टाकणें. ६ खाणें. एति.

ई, (ङ्) ४. आ. गतौ. जाणें. ईयते.

ईख्, (अ) १. प. ई (ङ्) पाहा. ईखति.

ईड्, (अ॒) १. आ. गतिकुत्सनयोः जाणें. २ निंदा करणें. ईजते.

ईड्, (अ॒) २. आ. स्तुतौ. स्तुति—प्रशंसा करणें. ईट्टे; ईडित.

ईड्, (अ) १०. उ. ईड् (अ॒) पाहा. ईडयति, ईडयते; ईडा.

ईर्, (अ॒) २. आ. गतौ कंपने. जाणें. २ कांपणें. ईर्ते; ईरिण.

ईर्, (अ) १०. उ. क्षेपे. प्रेरणा करणें, फेंकणें. ईरयति, ईरयते; प्रेरणा.

ईर्ष्यु, (अ) १. प. इर् पाहा. ईर्ष्यति; ईर्षा.

ईर्क्ष्यु, (अ) १. प. इर् पाहा ईर्क्ष्यति.

ईश्, (अ॒) २. आ. ऐश्वर्ये. पाहिजे तें करण्याची शक्ति— सामर्थ्य—प्रभाव असणें. ईष्टे; ईश्वर, ईश.

Digitized by Google

ईष्, (अ) १. आ. गति हिंसादर्शनेषु. जाणें. २ हिंसाकरणें. ३ पाहणें. ईषते; ईषा.

ईष्, (अ) १. प. उंच्छे. एक एक दाणा वेंचून घेणें. ईषति; ईषत्.

ईह्, (अ) १. आ. चेष्टायां. व्यापार—खटपट करणें. २ इच्छा करणें. ईहते; ईहा.

ईक्ष्, (अ) १. आ. दर्शने. पाहणें, बघणें. ईक्षते; ईक्षण.

उ.

उ, (ड्) १. आ. शब्दे. शब्द करणें. अवते.

उख्, (अ) १. प. गतौ. जाणें. ओखति.

उख्, (इ) १. प. गतौ जाणें. उंखति.

उच्, (अ) ४. प. समवाये. जमवणें. २ जमणें. उच्यति.

उछ्, (इ) १. प. उंछे दाणे वेंचणें उंछति; उंछ.

उछ्, (ई) १. प. विवासे. संपणें. २ संपवणें. व्युच्छति.

उछ्, (इ) ६. प. उंछे. दाणे वेंचणें. उंछति.

उज्ज्, (अ) ६. प. आर्जवे. सरळ भाव धरणें, सरळपणानें वागणें. उज्जति

उज्झ्, (अ) ६. प. उत्सर्गे. उत्सर्ग—त्याग करणें, सोडणें. उज्झति.

उठ्, (अ) १. प. उपघाते. नाशकरणें, उपसंहारकरणें. ओठति.

उंद्, (ई) ७. प. क्लेदने. आर्द्र—ओलें करणें. उनत्ति; उंदुरु.

उंध्रस्*, (अ) ९. प. उंछे. दाणेवेंचणें. उध्रस्नाति; ध्रस्नाति

उंध्रस्*, (अ) १०. उ. उंछे. दाणे वेंचणें. उध्रासयाति, उध्रासयते; ध्रासयति, ध्रासयते.

उभ्, (अ) ६. प. पूरणे. पू-

* उकार इत्संज्ञक मानून ध्रस् एवढाच धातु कोणी मानतात.

Digitized by Google

र्ण करणें, भरणें. उभति; उभय.

उंभ्, (अ) ६. प. उभ् पाहा. उंभति.

उरस्, ११. प. बलार्थे. बलवान् होणें. उरस्यति; उरस्.

उर्व्, (ई) १. प. हिंसार्थः हिंसा करणें, मारणें. उर्वति.

†**उलड्**, (इ) १०. उ. उत्क्षेपणे. वर फेंकणें—झुगारून देणें. उलंडयति, उलंडयते; लंडयति, लंडयते.

उष्, (अ) १. प. दाहे. जाळणें. २ उष्णता करणें. ओषति; उष्ण.

उषस्, ११. प. प्रभातीभावे. उजाडणें, प्रभात काल होणें. उषस्यति; उषस्.

उह्, (इर्) १. प. अर्दने. पीडा देणें. ओहति.

उक्ष्, (अ) १. प. सेचने. शिंपणें. (पाणी इ.) उक्षति; प्रोक्षण.

ऊ.

ऊठ्, (अ) १. प. उठ् पाहा. ऊठति.

ऊन, १०. उ. परिहाणे. कमी—उणें करणें—होणें. ऊनयति, ऊनयते; ऊन.

ऊय्, (ई) १. आ. तंतु संताने. विणणें. (वस्त्र वगैरे). ऊयते.

ऊर्ज्, (अ), १०. उ. बलप्राणनयोः बलवान् होणें. २ वांचणें ३ प्राण देणें, वांचवणें. ऊर्जयति, ऊर्जयते; ऊर्जस्वी.

ऊर्णु, (ञ्) २ उ. आच्छादने. झांकणें, आच्छादणें, वेष्टणें. ऊर्णोति; ऊर्णा.

ऊर्द्, (अ) १. आ. माने, क्रीडायां. मानणें. २ मोजणें. ३ खेळणें, क्रीडाकरणें. ऊर्दते

ऊष्, (अ) १. प रुजायां,

---

†कारास इत्संज्ञा मानून लड् एवढाच धातु कोणी मानतात.

Digitized by Google

संघाते. रोग होणें. २ एकत्र जमणें—मिळणें. ऊषति; ऊष.

ऊह्, (अ) १. आ. वितर्के. कल्पिणें, तर्क—कल्पना करणें. ऊहते; ऊह.

ऋ.

†ऋ, १. प. गति प्रापणयोः. जाणें. २पोंहोंचवणें. ऋच्छति; ऋत.

ऋ, ३, प. गतौ. जाणें. इयर्ति; अरि.

ऋच्, (अ) ६. प. स्तुतौ. स्तुति—प्रशंसा करणें. ऋचति; ऋक्, ऋचा.

ऋच्छ्, (अ) ६. प. गतीं द्रिय प्रलय मूर्तिं भावेषु. जाणें. २ इंद्रियशक्ति कमी होणें. ३ घट्ट—मूर्ति होणें. ऋच्छति; ऋच्छरा.

ऋज्, (अ) १. आ. गति स्थानार्जनोर्जनेषु. जाणें. २ उभें राहणें. ३ मिळवणें. ४ बलिष्ठहोणें, वांचणें. अर्जते.

ऋज्, (इ) १. आ. भर्जने. भाजणें. (दाणे, साळी वगैरे). ऋंजते; ऋजीष.

ऋण्, (उ) ८. उ. गतौ. जाणें. ऋणोति, ऋणुते; ऋण.

*ऋत्, १. प जुगुप्सायां, कृ. पायां. निंदाकरणें. २ कृपाकरणें. ऋतीयते.

ऋध्, (उ) ४. प. वृद्धौ. वाढणें, वृद्धिपावणें. ऋध्यति; ऋद्धि.

ऋध्, (उ) ५. प. मागला शब्द पाहा. ऋध्नोति.

ऋफ्, (अ) ६. प. हिंसायां. मारणें, पीडादेणें. ऋफति.

ऋंफ्, (अ) ६. प. ऋफ् पाहा. ऋंफति.

ऋष्, (ई) ६. प. गतौ. जाणें. ऋषति; ऋषि.

ऋक्षि, ५. प. हिंसायां. मार-

†यास सार्वधातुक प्रत्यय पुढें असतां ऋच्छ आदेश होऊन ऋच्छति इत्यादि रूपें होतात.

*हा धातुपाठांत नसतां "ऋतेरीयङ्" या सूत्रांत आहे त्यावरून मानिला आहे.

Digitized by Google

णें, हिंसाकरणें. ऋक्षिणोति; ऋक्ष.

ऋ.

ऋ, ९. प. गतौ. जाणें. ऋणाति.

ए.

एज्, (क्र) १. आ. दीप्तौ. प्रकाशणें, चमकणें. एजते.

एज्, (ऋ) १.प. कंपने. कांपणें, हालणें. एजति.

एद्, (अ) १. आ. विबाधायां. त्रासेदणें. २ हरकतकरणें. एठते.

एध्, (अ) १. आ. वृद्धौ. वाढणें. एधते; एधि.

एला, ११. प. विलासे. विलास—क्रीडा करणें. एलायति; एला.

एष्, (क्र) १. आ. गतौ. जाणें. एषते.

ओ.

ओख्, (ऋ) १. प. शोषणालमर्थयोः· शोषणें. २ पुरेकरणें, शोभवणें. ओखति.

ओण्, (ऋ) १. प. अपनयने. दूरनेणें, काढणें. ओणति.

+ओलड्, (इ) १०. उ. उत्क्षेपणे. वरफेंकणें—झोकणें. ओलंडयति, ओलंडयते; लंडयति, लंडयते.

क.

कक्, (अ) १. आ. लौल्ये. गर्वकरणें. २ चपळपणा करणें. ककते; काक.

कक्, (इ) १. आ. गतौ जाणें. कंकते; कंक.

कख्, (अ) १. प. हसने. हंसणें. कखति; कख्या.

कख्, (ए. म्) कख् (अ) पाहा. कखति.

कग्, (ए. म्) १. प. या धातूस अमुक अर्थ असा विशेष सांगितला नाहीं. कारण हा सामान्यक्रियार्थी

+ ओकारास इत्संज्ञा मानून लड् एवढाच धातु कोणी मानतात.

Digitized by Google

आहे. हा अनेक अर्थी आहे ह्मणून विशेष अर्थ सांगितला नाहीं असेंही कोणी ह्मणतात. कगति.

कच्, (अ) १. आ. बंधने. बांधणें. कचते; कच.

कच्, (इ) १. आ. दीप्ति बंधनयोः प्रकाशणें. २ बांधणें. कंचते, कंचन.

कट्, (ए) १. प. वर्षावरणयोः वर्षणें, पाऊस पडणें. २ कटाव करणें, वेढणें. कटति; कट.

कट्, (ई) १. प. गतौ. जाणें. प्रकटति; उत्कट.

कट्, (इ) १. प. गतौ. जाणें. कंटति; कंटक.

कठ्, (अ) १. प. कृच्छ्र जीवने. संकटानें जीवन—निर्वाह करणें, कंठणें, काढणें. कठति; कठ.

कठ्, (इ) १. आ. शोके, आध्याने. ध्यान—उत्कंठा धरणें. (एखाद्या गोष्टीचें) कंठते; उत्कंठा.

कठ्, (इ) १०. उ. मागचा धातु पाहा. कंठयति, कंठयते.

कड्, (इ) १. आ. मदे. गोंधळणें, बेशुद्ध होणें. उन्मत्त होणें, मद करणें. गुंग होणें कंडते.

कड्, (अ) १. प. कड् (इ) पाहा. कडति.

कड्, (इ) १. प. कड् (इ) पाहा. कंडति.

कड्, (अ) ६. प. कड् (इ) पाहा. कडति.

कड्, (इ) १०. उ. भेदने. भेदणें, भेद करणें, फोडणें. कंडयति, कंडयते; कंडन.

कंडू, (ऊ) ११. उ. गात्र विघर्षणे. अंग खाजवणें. २ कंड सुटणें. कंडूयति, कंडूयते; कंडू.

***कंड्**, (अ) १. प. कार्कश्ये. कर्कशपणा—कठोरपणा करणें; कंडति.

कण्, (अ) १. प. शब्दार्थः कणणें, कणकण असा श-

* कद्, ड् असें आहे.

Digitized by Google

ब्द करणें. २ शब्द करणें. कणति; कण.

कण्, (अ. मू.) १. प. गतौ. जाणें. कणाति; कणिका.

कण्, (अ) १०. उ. निमीलने. डोळे मिटणें. २ काण्या डोळ्यानें पाहणें. काणयति, काणयते; काण.

कत्र, १०. उ. शैथिल्यक्रियायां. सईल—शिथिल करणें. कत्रयति, कत्रयते.

कथ, १०. उ. वाक्यप्रबंधे. कथन करणें, सांगणें, व्याख्यान करणें—देणें. कथयति, कथयते; कथापयति, कथापयते ; कथन, कथा.

कथ्थ्, (अ) १. आ. श्लाघायां. प्रशंसा—स्तुति—वर्णन करणें. कथ्थते; विकथ्थन.

कद्, (इ. षू. मृ) १. आ. वैक्लव्ये, वेकल्यै. विव्हल—घाबरा होणें, विवळणें. २ न्यून—कमी—विकल होणें— करणें. कंदते; कंदर्प.

कद्, (अ. मू. षू) १. आ. मागचा शब्द पाहा. कदते; कदन.

कद्, (इ) १. प. आव्हाने रोदनेच. हाका मारणें. २ रडणें. कंदति.

कन्, (ई) १. प. दीप्तिकांतिगतिषु. प्रकाशणें. २ शोभणें. ३ जाणें. कनति; कनक, कंन्या.

कप्, (इ) १. आ. चलने. चळणें, कांपणें, हालणें. कंपते; कंप.

कब्, (ऋ) १. आ. वर्णे. रंगवणें, रंग देणें, चित्र विचित्र रंग देणें. कबते; कबरी.

कम्, (उ) १. आ. कांतौ. इच्छा करणें, इच्छिणें. कामयते; काम, कामना.

कर्ज्, (अ) १. प. व्यथने. दुखवणें, पीडा—व्यथा देणें. कर्जति; कर्ज.

Digitized by Google

+कर्ण, १०. उ. भेदने. विंधणें, टोचणें, भोंकपाडणें. कर्णयति, कर्णयते

+कर्त्त, १०. उ. कत्र पाहा. कर्त्तयति; कर्त्तयते.

कर्द, (अ) १. प. कुत्सिते शब्दे. पोटांत गुरगुरणें. २ कावळ्याप्रमाणें ओरडणें. कर्दति; कर्द.

कर्ब्, (अ) १. प. गतौ. जाणें, पोहोंचणें. कर्बति; कर्बर.

कर्व्, (अ) १. प. दर्पे. गर्व—डौल करणें. कर्वति; कर्वट.

कल्, (अ॒) १. आ. शब्द संख्यानयोः· शब्द करणें. २ मोजणें. ३ घेणें, समजणें. कलते; कलना.

कल्, (अ) १०. उ. क्षेपे. टाकणें, फेंकणें. कालयति, कालयते; काल.

कल, १०. उ. गतौ संख्यानेच. जाणें. २ मोजणें, गणणें. कलयति, कलयते.

कल्ल, (अ) १. आ. अव्यक्ते शब्दे. अस्पष्ट ध्वनि करणें. २ वाईट शब्द करणें. कल्लते; कल्ल.

कश्, (अ॒) २. आ. गतिशासनयोः· जाणें. २ शासन करणें. कष्टे; कशा.

कष्, (अ) १. प. हिंसार्थः· मारणें, हिंसा करणें. २. घासणें, इजादेणें. कषति; कष.

कस्, (अ) १. प. गतौ. हालणें. कसति; कस.

कस्, (इ॒) २. आ. गतिशासनयोः· जाणें. २ शासन—आज्ञा करणें. कंस्ते; कंस.

+कस्, (अ॒) २. आ. मागचा धातु पाहा. कस्ते. कस.

काच्, (इ॒) १. आ. कच्, (इ॒) पाहा. कांचते; कांची.

काल, १०. उ. उपदेशे. उपदेश करणें. २ काल मोजणें. कालयति, कालयते; काली.

Digitized by Google

काश्, (ऋ) १. आ. दीप्तौ. प्रकाशणें, चमकणें. काशते; आकाश.

काश्, (ऋ) ४. आ. काश् पाहा. काश्यते; प्रकाश.

कास्, (ऋ) १. आ. शब्द कुत्सयां. वाईट — कुत्सित शब्द करणें. खोकणें. कासते; कास.

काङ्क्ष्, (इ) १. प. कांक्षायां. इच्छिणें, इच्छा—लोभ धरणें. कांक्षति; आकांक्षा.

कि, ३. प. ज्ञाने. जाणणें, समजणें. चिकेति.

किट्, (अ) १. प. त्रासे. किट किट करणें, त्रासवणें. २भिववणें. किटाति.

किट्, (अ) १. प. गतौ. जाणें. किटाति; किटि.

कित्, (अ) १. प. निवासे रोगापनयनेच. राहणें, वास करणें. २ रोग बरा करणें, वैद्यकी करणें. चिकित्साति; चिकित्सा.

कित्, (अ) १. आ. कित् (अ) पाहा. चिकित्सते; विचिकित्सा.

किल्, (अ) ६. प श्वेत्य क्रीडनयोः· शुभ्र—पांढरा होणें. २ खेळणें, क्रीडा करणें. किलति; किलकिला, किलास.

कीट्, (अ) १०. उ. वर्णे. रंगवणें. कीटयति, कीटयते; कीट.

कील्, (अ) १. प. बंधने. खिळवणें, खिळे मारून बंद करणें. कीलति; कीलक.

कु, (ङ्) १. आ. शब्दे. शब्द करणें. अस्पष्ट ध्वनि करणें. कवते; कु.

कु, २. प. कु (ङ्) पाहा. कौति; कवि.

कु, (ङ्) ६. आ. कु (ङ्) पाहा. कुवते.

कु, (ञ्) ९. उ. कु (ङ्) पाहा. कुनाति, कुनीते.

Digitized by Google

कुक्, (अ) १. आ. आदाने. घेणें. कोकते; कोक.

कुच्, (अ) १. प. शब्देतारे. उंच स्वरानें ओरडणें, किंकाळणें. कोचति.

कुच्, (अ) १. प. संपर्चन कौटिल्य प्रतिष्टंभविलेखनेषु. घासून चक्क करणें, स्पर्शणें. २ वांकडा होणें. ३ प्रतिबंध करणें. ४ रेघा वगैरे काढणें. कोचति; कुच.

कुच् (अ) ६. प. संकोचने. संकोच पावणें, आकुंचित होणें, आंखडणें. कुचति; संकोच.

कुंच्, (अ) १. प. कौटिल्यालपी—भावयोः वांकडा होणें—करणें. २ थोडा होणें—करणें. कुंचति; कुंचिका.

कुज्, (उ) १. प. स्तेय करणें, चोरणें. कोजति.

कुट्, (अ) ६. प. कौटिल्ये. वांकडा होणें—करणें. कुटति; कुटिल.

+कुट्, (अ) १०. आ. छेदने. छेदणें, तोडणें, कुटणें. कोटयते.

+कुटुंब्, (अ) १०. आ. धारणें. धारण करणें, बाळगणें, वागवणें. कुटुंबयते; कुटुंब.

कुट्ट्, (अ) १०. उ. छेदन भर्त्सनयोः छेदणें, कुटणें. २ खरड काढणें, निर्भर्त्सना—निंदा करणें. कुट्टयति, कुट्टयते; कुट्टन.

कुट्ट्, (अ) १०. आ. प्रतापने. तापवणें, कढवणें, कढत करणें. कुट्टयते; कुट्टक.

कुठ्, (इ) १. प. प्रतिघातें. कुंठित करणें, कुंठवणें. २ खुंटणें. कुंठति; कुंठित.

+कुठ्, (इ) १०. उ. वेष्टने. वेढणें. २ मागचा धातु पाहा. कुंठयति, कंठयते.

कुड्, (इ) १. प. वैकल्ये. न्यून—कमी विकल होणें.

Digitized by Google

२ गोंधळणें, घोटाळणें. कुंडति; कुंडिका.

कुड्, (इ) १. प. दाहे. जाळणें, भस्मकरणें. कुंडति; कुंड.

कुड्, (अ) ६. प. बाल्ये, संघाते. मुला .प्रमाणें—मूलपणा करणें. २ मुलासारखें खेळणें. ३ जमवणें, ढीग घालणें. कुडति.

कुड्, (इ) १०. उ. रक्षणें. राखणें, पाळणें, जपणें. कुंडयति, कुंडयते; कुंड.

कुण्, (अ) ६. प. शब्दोपकरणयोः· शब्द करणें. २ राखणें, संभाळणें. कुणति; कुणि.

कुण्, १०. उ. आमंत्रणे. बोलणें, भाषण—संभाषण करणें. कुणयति, कुणयते

कुत्स्, (अ) १०. आ. अवक्षेपणे. दोष देणें, तिरस्कार करणें. कुत्सयते; कुत्सा, कुत्सित.

कुथ्, (इ) १. प. हिंसाक्लेशनयोः· मारणें, हिंसाकरणें. २ त्रास—दुःख—क्लेश देणें.—भोगणें. कुंथति; कुथ.

कुथ्, (अ) ४. प. पूती भावे. वाईट वास— घाण—दुर्गंध येणें, घाणणें. कुथ्यति.

कुथ्, (अ) ९. प. संश्लेषणे. संयुक्त—सलग्न होणें, संधिपावणें. २ संकटांत पडणें. कुथ्नाति; कुथ.

कुद्, (इ) १०. उ. अनृत भाषणे. खोटें—असत्य बोलणें. कुंद्रयति, कुंद्रयते.

कुप्, (अ) ४ प. क्रोधे. रागावणें, कोपणें. कुप्यति; कोप.

कुप्, (अ) १०. प. उ. भाषार्थः· बोलणें. २ प्रकाशणें. कोपयति, कोपयते.

कुब्, (इ) १. प. पुढचा शब्द पाहा. कुंबति.

Digitized by Google

कबृ, †कुभ्, (इ) १०. उ. आच्छादने. झांकणें, पांघरूण घालणें. कुंबयति, कुंबयते. कुंभयति, कुंभयते.

कुमार, १०. उ. क्रीडायां. खेळणें, क्रीडा करणें. कुमारयति, कुमारयते; कुमार.

कुर्, (अ) ६. प. शब्दे. शब्द—ध्वनि—कुरकुर करणें. कुरति.

कुर्द् (अ) १. आ. क्रीडायां. खेळणें. कूर्दते; कूर्दा.

कुल्, (अ) १. प. संस्त्याने बंधुषुच. जमवणें, एकत्र करणें. २ नात्याचा—आप्त असणें. ३ आप्ताप्रमाणें करणें. कुलति; कुल.

कुश्, (अ) ४. प. आलिंगनवेष्टनयोः. आलिंगन करणें. २ गुंडाळणें. कुश्यति; कुश.

कुश्, (इ) १०. उ. दीप्तौ. प्रकाशणें. कुंशयति, कुंशयते; कुश.

कुष्, (अ) ९. प. निष्कर्षे. बाहेर काढणें. पिळून—जोरानें काढणें. कुष्णाति. कुषल.

कुषुभ, ११. प. क्षेपे. टाकणें, फेकणें. कुषुभ्याति.

कुस्, (अ) ४. प. संश्लेषणें. जोडणें. २ वेष्टणें. कुस्यति.

कुस् (इ) १०. उ. कुप् (अ) १०. पाहा. कुंसयति, कुंसयते.

†कुस्म्, (अ) १०. आ. कुत्सितस्मयने. वाईट—दोष ठेवण्या सारखें हंसणें. कुस्मयते; कुस्मित.

कुह, १०. आ. विस्मायने. आश्चर्य—अचंबा—चमत्कार वाटवणें. कुहयते; कुहक (जादूगीर.)

कू, (ङ्) ६. आ. शब्दे. कूंकूं असा शब्द करणें, विवळणें. कुवते; कू.

कू, (नृ) ९. उ. कू (ङ्) पाहा. कुनाति, कुनीते.

Digitized by Google

कूज्, (अ) १. प. अव्यक्ते शब्दे. अस्पष्ट—पक्ष्या सारखा ध्वनि करणें. कूजति; कूजित.

कूट्, (भ्) १०. आ. आप्रवणे, अवसादने. न देणें. २ अस्पष्ट—न समजे सारखें करणें, घोटाळा करणें. कूटयते; कूट.

कूट, १०. उ. परितापे, परिदाहे.. दुःख देणें, संतापवणें. कूटयति, कूटयते; कूट.

कूड् (अ) ६. प. दार्ढ्ये. घट्ट—पक्का—बळकट होणें. कूडति; कूडथ.

कूण्, (भ्) १०. आ. संकोचने. आखडणें, संकुचित होणें. कूणयते; कूणित.

कूण, १०. उ. कूण् (अ) पाहा. कूणयति, कूणयते; कूणि.

कूल्, (अ) १. प. आवरणे. वेष्टणें, आवार घालणें, आच्छादणें. कूलति; कूल.

कॄ, (तॄ) ५. उ. हिंसायां. मारणें, हिंसा करणें. कृणोति, कृणुते.

कॄ, (डु कृञ्) ८. उ. करणे. कोणती एखादी क्रिया करणें. करोति, कुरुते; कर्त्ता, कारक, उपकार, प्रकार.

कृड्, (अ) ६.प. घनत्वे. घट्ट होणें, थिजणें, विरजणें. कृडति.

कृड्, (अ) ६. प. निमज्जने. बुडणें. कृडति.

कृत्, (ई) ६. प. छेदने. कातरणें. कृंतति; कृंतन, कर्तरी.

कृत्, (ई) ७. प. वेष्टने, गुंडाळणें, वेढणें. कृणत्ति; कृत्ति.

कृप्, (ऊ) १. आ. सामर्थ्ये. समर्थ—शक्तिमान् होणें. २ कल्पना करणें. कल्पते; कल्पना, कृप्ति.

कृप्, (ऊ) १०. उ. कृप्

Digitized by Google

(ऊ) पाहा. कल्पयति, कल्पयते; कल्प.

कृप, १०. दौर्बल्ये.—अशक्त दुर्बल होणें. कृपयति, कृपयते; कृपा.

कृष्, (इ) १. प. हिंसाकरणयोः गतौच. मारणें, हिंसाकरणें. २ साधन—अनुकूल होणें. ३ जाणें. कृणोति.

कृश्, (अ) ४. प. तनूकरणें. बारीक—सूक्ष्म करणें. कृश्यति; कृश.

कृष्, (अ) १. प. विलेखने. लिहिणें, रेघा काढणें. २ नांगरणें, पाभारे पाडणें. कृषति; कृषि, आकर्षण, प्रकर्ष, उत्कर्ष.

कृष्, (अं) ६. उ. कृष् पाहा. कृषति; कृषते.

कॄ, ६. प. विक्षेपे. फेकणें, टाकणें. किरति; विकिर, संकीर्ण, प्रकीर्ण,

कॄ, (ऊ) ९. उ. हिंसायां. मारणें, हिंसाकरणें कृणाति, कृणुते.

कॄ, ९. प. कृ (ऊ) पाहा. कृणाति.

कृत्, (अ) १०. उ. संशब्दने. कीर्ति—नांव लौकिक करणें. २ प्रसिद्ध—जग जाहीरकरणें. ३कीर्तनकरणें. कीर्तयति; कीर्ति, कीर्तन.

केत्, १०. उ. श्रावणे, निमंत्रणे, आमंत्रणे. बोलावणें, आमंत्रण करणें. २ मसलत—संकेत करणें. केतयति, केतयते; संकेत.

केप्, (ऋ) १. आ. कंपने गतौच. कांपणें. २ जाणें, शिरणें. केपते.

केल्, (ऋ) १. प. चलने. हालवणें, जाणें. केलति; केलि.

केला, ११. प. विलासे. खेळणें, विलास—क्रीडाकरणें. केलायति; केलि.

कै, १. प. शब्दे. शब्दकरणें. कायति; काक.

Digitized by Google

क्नथ्, (अ) १. प. हिंसार्थः. मारणें, प्राणघेणें. क्नथति

क्नस्, (उ) ४. प. व्हरणदीप्त्योः· शरीरानें अथवा मनानें वक्रअसणें. २ प्रकाशणें, चमकणें. क्नस्यति.

क्नू, (ऊ) ९. उ. शब्दे. शब्दकरणें. क्नुनाति, क्नुनीते.

क्नूय्, (ई) १. आ. शब्दे उंदेच. वाजणें, शब्दकरणें. २ ओलें—दमटहोणें. ३ घाणणें; क्नूयते. क्नूयितृ.

क्मर्, (अ) १. प. हूर्छने. वक्र—वांकडा असणें. २ ठक—कपटी असणें. क्मराति.

क्रथ्, (अ) १. प. क्नथ् पाहा. क्रथति.

क्रद्, (इ. ष्. म्) १. आ. कद्, (इ. ष्. म्) पाहा. क्रंदते; आक्रंद.

+क्रद्, (अ. ष्. म्) १. आ. कद् (इ. ष्. म्) पाहा. क्रदते.

क्रद्, (इ.) ९. प. कद् (इ) पाहा. क्रंदति.

क्रंद्, (अ) १०. उ. क्रंदसादत्ये. सतत शोकरणें. आक्रंदयति, आक्रंदयते; आक्रंद.

क्रप्, (अ. ष्. म्) १. आ. कृपायां, गतौ. कृपा करणें. २ जाणें. क्रपते.

क्रम्, (उ) १. प. पादविक्षेपे. चालणें, जाणें. क्रमति; क्रम, क्रमण.

क्री, (डु. ञ्) ९. उ. द्रव्य विनिमये. विकतघेणें, अदलाबदल करणें. क्रीणाति. क्रीणीते; क्रय, विक्रय.

क्रीड्, (ऋ) १. प. विहारे. खेळणें, क्रीडा—विहार करणें. क्रीडति; क्रीडा.

कुंच्, (अ) १. प कुंच् पाहा. कुंचति.

क्रुध्, (अ) ४. क्रोधे. रागावणें. क्रुध्यति; क्रोध, क्रुद्ध.

Digitized by Google

क्रुश्, (अ) १. प. कद् (इ) पाहा. क्रोशति; आक्रोश.

क्रेव्, (ऋ) १. आ. सेवने. भजणें, सेवा—भजन करणें. २ घेणें, सेवन करणें. क्रेवते.

क्लथ्, (अ) १. प. क्लथ् पाहा. क्लथति.

क्लद्, (इ. ष्. म्) १. आ. कद् (इ. ष्. म्) पाहा. क्लंदते.

†क्लद्, (अ. ष्. म्) १. आ. कद् (इ. ष् म्) पाहा. क्लदते.

क्लद्, (इ) १. प. कद (इ) पाहा. क्लंदति.

क्लप्, (अ) १०. उ. अव्यक्तायांवाचि. अस्पष्ट ध्वनि काढणें, किलबिलकरणें. क्लपयति, क्लपयते.

क्लम्, (उ) ४. प. ग्लानौ. थकणें, ग्लानि येणें, निर्जीव होणें. क्लाम्यति; क्लम.

क्लिद्, (इ) १. आ. परिदेवने. शोक—खेद करणें. क्लिंदते.

क्लिद्, (इ) १. प. क्लिद् (इ) पाहा. क्लिंदति.

क्लिद्, (ऊ) ४. प. आर्द्रीभावे. ओलाहोणें. क्लिद्यति; क्लिन्न, क्लेद.

क्लिश्, (अ) ४. आ. उपतापे. दुःख सोसणें. २ दुःख देणें. क्लिश्यति; क्लेश.

क्लिश्, (ऊ) ९. प. विबाधने. त्रास—क्लेश देणें. २ विरुद्धकरणें—वागणें. क्लिश्नाति; क्लेश.

क्लीब्, (ऋ) १. आ. अधाष्टर्ये. भित्रा—लाजाळू असणें, निर्जीव—नेभळा असणें. क्लीबते; क्लीब.

क्लीव्, (ऋ) १. आ. धाष्टर्ये. धैर्यवान—हिय्याचा—छातीचा असणें. क्लीवते.

†क्लु, (उ.) आ. गतौ. जाणें. क्लवते; विक्लव.

क्लेश्, (अ) १. आ. अव्य-

Digitized by Google

क्तायांवाचि. पीडा—बाधाकरणें, बाधणें. क्लेशते; क्लेश.

क्वण्, (अ) १. प. कण् (अ) पाहा. क्वणति; क्वण, क्वाण.

क्वथ्, (ए) १. प. निष्पाके. शिजवणें, कढवणें, पचवणें. क्वथति; क्वाथ.

ख.

खक्ख्, (अ) १. प. हसने. हंसणें. खक्खति.

खच्, (अ) ९. प. भूतप्रादुर्भावे. योग्य मर्यादा संपल्यावर बहुत काळानें जन्मणें—उत्पन्नहोणें. २ संपत्ति देणें. ३ पवित्र—पावन करणें. खच्चाप्नोति; खौ-नाति.*

खज्, (अ) १. प. मंथे. घुसळणें, मंथन करणें. खजति; खज.

खज्, (इ) १. प. गतिवैकल्ये. वांकडें चालणें, लंगडणें. खंजति; खंज.

खट्, (अ) १. प. कांक्षायां. इच्छाकरणें, शोधणें. खटति; खट.

खट्ट्, (अ) १०. उ. संवरणे. झांकणें, आच्छादणें. खट्टयति, खट्टयते; खट्टन.

खड्, (इ) १. प. आ. खज् (अ) पाहा. २ तुकडे करणें. खंडते; खंड.

खड्, (अ) १०. उ. भेदनें, तोडणें, विदारणें. खाडयति, खाडयते; खड्ग.

खड्, (इ) १०. उ. खड् (अ) पाहा. खंडयति, खंडयते; खंडन.

खद्, (अ) १. प. स्थैर्यहिंसाभक्षणेषु. स्थिरअसणें. २ मारणें. ३ खाणें. खदति; खदिर.

खन्, (उ) १. उ. अवदारणे. उकरणें, खणणें. खनति, खनते; खनि.

* कोणी "खद्" असा पढतात त्यांच्या मतीं हें रूप होतें.

Digitized by Google

खब्, (अ) १. प. गतौ. जाणें. खबति.

खर्ज्, (अ) १. प. पूजाव्यथनयोः· पूजा करणें, सन्मान देणें. २ पीडा—दुःख देणें. ३ स्वच्छकरणें. खर्जति; खर्जू.

खर्द्, (अ) १. प. दंदशू के. चावणें, दंशकरणें, डसणें. खर्दति.

खर्व्, (अ) १. प. दर्पे. गर्वकरणें. खर्वति; खर्व.

खल्, (अ) १. प. संचये. जमवणें. खलति; खल.

+खव्, (अ) ९. प. खच् पाहा. खौनाति.

खष्, (अ) १. प. हिंसार्थः· मारणें. खषति.

खाद्, (अ) १. प. भक्षणे. खाणें, भक्षणें. खादति; खाद्य.

खिट्, (अ) १. प. त्रासे. त्रासवणें, खिटखिट करणें. २ भय दाखवणें. खेटति.

खिद्, (अ) ४. आ. दैन्ये. दुःख—संकट भोगणें.—सोसणें. खिद्यते; खेद.

खिद्, (अ) ६. प. परिघाते. खिद् (अ) पाहा. खिदति.

खिद्, (अ) ७. आ. खिद् (अ) पाहा. खिंते.

खिल्, (अ) ६. प. उंछे. एक एक दाणा वेंचणें. खिलति.

+खु, (ङु) १. आ. शब्दे. वाजणें, शब्द करणें. खवते.

खुञ्, (उ) १. प. स्तेयकरणे. चोरणें. खोजति.

+खुड्, (अ) ६. प. खट् पाहा. २ खोडणें, हरताळ लावणें. खुडति.

खुड्, (इ) १०. उ. खंडने. खंडन—तुकडे करणें, खुडणें. खुंडयति, खुंडयते.

खुर्द्, (अ) १. आ. क्रीडायां. खेळणें. खूर्दते.

खुर्, (अ) ६. प. छेदने. तोडणें, ओरखाडणें. खुरति; खुर.

Digitized by Google

खेट, १०. उ. भक्षणे. खाणें. खेटयति, खेटयते; खेटक.

†खेड, १०. उ. खेट पाहा. खेडयति, खेडयते.

खेल्, (ऋ) १. प. चलने. हालणें, चळणें, कांपणें. खेलति; खेलन.

खेला, ११. प. विलासे. क्रीडा–विलास करणें. खेलायति; खेला.

खेव्, (ऋ) १. भा. सेवने. सेवा–चाकरी करणें. खेवते.

खै, १. प. खेदने. मारणें, उपद्रवकरणें. २ दुःख–खेदकरणें. खायति.

†खोट, १०. उ. खेट पाहा. खोटयति, खोटयते; खोटि.

खोर्, (ऋ) १. प. गतिप्रतिघाते. लंगडणें, चालण्यासनयेणें. खोराते; खोरि, खोर.

खोल्, (ऋ) १. प. खोर् पाहा. खोलति; खोल.

ख्या, २. प. प्रकथने. सांगणें, बोलणें, व्याख्याकरणें. ख्याति; आख्यान.

ग.

गज्, (अ) १. प. शब्दार्थः. शब्द करणें. २ शिंगणें, बेशुद्धहोणें. गजति; गज.

गज्, (इ) १. प. गज् (अ) पाहा. गंजति; गंजा.

गज्, (अ) १०. उ. गज् (अ) पाहा. गजयति, गजयते; गज.

गड्, (इ) १. प. वदनैकदेशे. गालास रोग होणें, गंडमाळा होणें. गंडति; गंड.

गंड्, (अ. मू) १. प. सेचने. शिंपणें. २ वाहणें. गडति, गडयति.

गण, १०. उ. संख्याने. मोजणें, गणणें. गणयति; गणित, गणना.

Digitized by Google

गद्, (अ) १. प. व्यक्तायांवाचि. स्पष्ट–साफ बोलणें. २ अजारी होणें. गदति; गद.

गद्, (इ) १. प. गड् (इ) पाहा. २ रोगहोणें गंदति.

गदी, १०. उ. देवशब्दे. गर्जना करणें (मेघांची). गदयति, गदयते; गदयित्नु.

गद्गद, ११. प. वाक्स्खलने. लागत–कंठभरून आल्याप्रमाणें बोलणें. गद्गदयति; गद्गद.

गंध्, (अ) १०. आ. अर्दने. चुरणें, पीडणें, मारणें, घासणें. गंधयते; गंध.

गम्, (लृ) १. प. गतौ. जाणें. गच्छति; गमन.

गर्ज्, (अ) १. प. शब्दे. शब्द–गर्जना करणें, गरजणें. गर्जति; गर्जना.

†गर्ज्, (अ) १०. उ. गर्ज् (अ) १. पाहा. गर्जयति, गर्जयते.

गर्द्, (अ) १. प. गर्ज् (अ) १. पाहा. गर्दति; गर्दभ.

गर्द्, (अ) १०. उ. गर्ज् (अ) १. पाहा. गर्दयति, गर्दयते.

गर्ध्, (अ) १०. उ. अभिकांक्षायां. इच्छिणें, आशाकरणें–धरणें. गर्धयति, गर्धयते; गर्धन.

गर्ब्, (अ) १. प. गतौ. जाणें. गर्बति; गर्ब.

गर्व्, (अ) १. प. दर्पे. गर्व–अहंता करणें–धरणें. गर्वति; गर्व.

गर्व, १०. आ. माने. गर्व् (अ) पाहा. गर्वयते.

गर्ह्, (अ) १. आ. कुत्सायां. निंदा–कुत्सा करणें. गर्हते; गर्हित, गर्हा.

गर्ह्, (अ) १०. उ. विनिंदने. निंदाकरणें, दोषलावणें. गर्हयति, गर्हयते.

गल्, (अ) १. प. अदने.

Digitized by Google

खाणें, गिळणें. गलति; गल.

गल्, (अ) १०. आ. स्रवणे. गळणें, पाझरणें. गलयते; गल.

गल्भ्, (अ) १. आ. धाष्टर्ये. धारिष्ट–छाति–हिय्या करणें. गल्भते; प्रगल्भ.

गल्ह्, (अ) १. आ. गर्ह् (अ) पाहा. गल्हते.

गवेष, १०. उ. मार्गणे. शोधणें, शोध–पत्तालावणें. गवेषयति, गवेषयते; गवेषण.

गा, २. प. स्तुतौ. स्तुति–प्रशंसाकरणें. जिगाति; गाथा, गान.

गा, (ङ्) १. आ. गतौ. जाणें. गाते.

गाध्, (ऋ) १. आ. प्रतिष्ठा लिप्सयोर्ग्रंथेच. राहणें, थांबणें. २ शोधकरणें, मिळण्याची इच्छा करणें. ३ ग्रंथ जुळणें–करणें–रचणें. गाधते; गाध.

गाह्, (ऊ) १. आ. विलोडने. हालवणे, मथनकरणें, २ स्नान करणें. गाहत; अवगाहन.

गु, ६. प. पुरीषोत्सर्गे. मलविसर्जनकरणें, परसाकडे जाणें. गुवति.

गु, (ङ्) १. प. अव्यक्ते शब्दे. अस्पष्ट–अस्वच्छ शब्द करणें. गवते; गवय

गुज् (अ) ६. प. शब्दे. शब्दकरणें. गुजति; गुग्गुल.

गुञ्, (इ) १. प. अव्यक्ते शब्दे. गु (ङ्) पाहा. गुणगुणणें. गुंजति; गुंजारव.

गुड्, (अ) ६. प. रक्षायां. राखणें, संभाळणें, बचावणें. गुडति; गुडाका.

गुड्, (इ) १०. उ. वेष्टने, रक्षणेच. गुंडाळणें. २ राखणें, संभाळणें. गुंडयति, गुंडयते; गुंडक.

गुण, १०. उ. आमंत्रणे बो-

Digitized by Google

लावणें, पाचारणें. २ मसलत–सल्ला देणें. गुणयति, गुणयते; गुण.

गुद्, (अ) १. आ. क्रीडायां. खेळणें. गोदते; गुद.

गुध्, (अ) ४. प. परिवेष्टने. गुंडाळणें, वेष्टणें. वेढणें, गुध्यति; गुधित, गुधेर.

गुध्, (अ) ९. प. रोषे. राग–रोषकरणें, रागावणें. गुध्नाति.

गुप्, (अ) १. आ. गोपने. राखणें, बचावणें. २ लपवणें. ३ दोषलावणें. जुगुप्सते; जुगुप्सा, गुप्त, गोप.

गुप्, (अ) ४. प. व्याकुलत्वे. व्याकुळहोणें, गोंधळणें. गुप्यति; गुप्त.

गुप्, (अ) १०. उ. भाषार्थः. बोलणें. २ प्रकाशणें. गोपयति, गोपयते.

गुप्, (ऊ) १. प. रक्षणे. राखणें, संभाळणें. गोपयति.

गुफ्, (अ) ६. प. ग्रंथे. गुंफणें, ओवणें, गांठवणें. गुफति; गोफणा.

गुंफ्, (अ) ६. प. गुफ् पाहा. गुंफति; गुंफा.

गुर्, (ई) ६. आ. उद्यमने. उद्योग–मेहनत – प्रयत्न करणें. गुरते; गुरण.

गुर्द्, (अ) १. आ. गुद् पाहा. गूर्दते.

गुर्द्, (अ) १०. उ. निकेतने. राहणें, वासकरणें. गूर्दयति, गूर्दयते.

गुर्व्, (ई) १. प. गुर् पाहा. गूर्वति.

गुह्, (ऊ) १. उ. संवरणे. झांकणें, आच्छादणें, पांघरणें. गोहति, गोहते; गुह्य.

गूर्, (अ) १०. आ. गुर् पाहा. गूरयते; गूरण.

गूर्, (ई) ४. आ. हिंसागत्योः. मारणें. २ जाणें. गूर्यते.

गृ, १. प. सेचने. शिंपणें, ओलाकरणें, गरति; गरुत्.

Digitized by Google

गृ, १०. आ. विज्ञाने. जाणणें, उमजणें. गारयते.

गृज्, (अ) १. प. गज् (अ) १. पाहा. गर्जति.

गृज्, (इ) १. प. गज् (अ) १. पाहा. गृंजति; गृंजना.

गृध्, (उ) ४. प. अभिकांक्षायां. उत्कंठेनें इच्छिणें. गृध्यति; गृधु.

गृह्, (ऊ) १. आ. ग्रहणे. घेणें, धरणें. गर्हते; गृह.

गृह, १०. आ. गृह् पाहा. गृहयते.

गॄ, ६. प. निगरणें. गिळणें. गिरति, गिलति; गिरि, गिलित.

+गॄ, ९. प. वयोहानौ. म्हातारा—वृद्ध होणें. गृणाति.

गॄ, ९. प. शब्दे. शब्द—ध्वनि करणें. गृणाति; गिरि.

गेप्, (ऋ) १. आ. कंपने गतौच. कांपणें. २ जाणें. गेपते.

गेव्, (ऋ) १. आ. सेवने. सेवा—चाकरी करणें. गेवते.

गेष्, (ऋ) १. आ. अन्विच्छायां. शोधणें, शोध—तलास लावणें. गेषते.

गै, १. प. शब्दे. शब्द करणे, गाणें. गायति; गायन.

गोम, १०. उ. उपलेपने. सारवणें, लेपणें. गोमयति, गोमयते; गोमय.

गोष्ठ्, (अ) १. आ. संघाते. जमवणें. संचयकरणें. गोष्ठते; गोष्ठ, गोष्ठी.

ग्रथ्, (इ) १. आ. कौटिल्ये. वांकडा—वक्र होणें. ग्रंथते; ग्रंथि; ग्रंथ

ग्रंथ्, (अ) ९. प. संदर्भे. बांधणें, लावणें, जुळणें. ग्रथ्नाति; ग्रंथ.

ग्रंथ्, (अ) १०. उ. बंधने. बांधणें, रचणें. ग्रंथयति, ग्रंथयते; ग्रंथ.

ग्रंथ्, (अ) १०. उ. संदर्भे. जुळणें, संगति—संद-

Digitized by Google

र्भ लावणें. ग्रंथयति, ग्रंथयते; ग्रंथ.

ग्रस्, (अ) १०. उ. ग्रहणे. घेणें. ग्रासयति, ग्रासयते; ग्रास.

ग्रस्, (उ) १. आ. अदने. खाणें, भक्षणें. ग्रसते; ग्रास.

ग्रह्, (अं) ९. उ. उपादाने. घेणें, ग्रहण—स्वीकार करणें. गृण्हाति, गृण्हीते; ग्रहण.

ग्राम, १०. उ. आमंत्रणे. बोलावणें. २ उपदेश—बुद्धिवाद सांगणें. ग्रामयति, ग्रामयते; ग्राम.

ग्रुच्, (उ) १. प. स्तेयकरणे. चोरणें. ग्रोचति.

ग्लस्, (उ) १. आ. ग्रस्. (उ) पाहा. ग्लसते; ग्लस्त.

ग्लह्, (अ) १. आ. ग्रह् (अं) पाहा. ग्लहते; ग्लह.

ग्लुच्, (उ) १. प. ग्रुच् पाहा. ग्लोचति.

ग्लुंच्, (उ) १. प. गतौ. जाणें. ग्लुंचति.

ग्लेप्, (ऋ) १. आ. दैन्ये कंपनेच. दरिद्र्येणें. २ कापणें. ग्लेपते.

ग्लेव्, (ऋ) १. आ. गेव् पाहा. ग्लेवते.

ग्लेष्, (ऋ) १. आ. गेष् पाहा. ग्लेषते.

+ग्लै, १. प. हर्षक्षये. ग्लानि—मलूलपणायेणें. ग्लायति; ग्लानि, ग्लास्नु.

घ.

घघ्, (अ) १. प. हसने. हंसणें, उपहास—फजिती करणें. घघति.

घट्, (अ. म. ष्) १. आ. चेष्टायां. करणें, घडणें घटते, घटयति; घट, घटना.

घट्, (अ) १०. उ. चलने. चाळवणें, घाटघाट करणें. घाटयाति, घाटयते; घाट.

Digitized by Google

घट्, (अ) १०. उ. संघाते. जमवणें, संचयकरणें. घाटयति, घाटयते; घटा.

घट्, (अ) १०. उ. भाषार्थः· बोलणें. २ प्रकाशणें. घाटयति, घाटयते; घाट.

घट्, (इ) १०. उ. मागचा शब्द पाहा. घंटयति, घंटयते; घंटा.

घट्ट्, (अ) १. आ. चलने. चाळवणें, हालवणें. २ जाणें. घट्टते; घट्ट, घट्टना.

घस्*, (ल) १. प. अदने. खाणें, भक्षणें. घसति; घास, घासि.

घिण्, (इ) १. प. ग्रहणे. घेणें. घिण्णते.

घु, (ङ्) १. आ. कु (ङ्) पाहा. घवते; घु.

घुट्, (अ) १. आ. परिवर्त्तने. माघारा—परत येणें. २ देवघेव करणें. घोटयते; घोटक.

घुड्, (अ) ६. प. प्रतीघाते. मारणें, प्रतीकार—प्रतिक्रिया करणें. घुडति.

घुण्, (अ) ६. प. भ्रमणे फिरणें, भ्रमण करणें. घुणति; घुण.

घुण्, (अ) १. आ. घुण् (अ) पाहा. घोणते; घोणा.

घुण्, (इ) १. आ. घिण् पाहा. घुण्णते.

घुर्, (अ) ६. प. भीमार्थ शब्दयोः· भयंकर असणें—होणें. २ शब्दकरणें. घुराति; घोर.

+घुष्, (अ) १. आ. कांतिकरणें. सुंदर—चकचकीत करणें. घोषते; घोष.

घुष्, (इ) १. आ. घुष् (अ) पाहा. घुंषते.

घुष्, (इर्) १०. उ. विशब्दने. बोलणें, शब्दानें—वाणीनें निश्चय करणें. घोषयति, घोषयते; घोषति; आघोषयति; घोष.

* ह्याचा प्रयोग सर्वत्र होत नाहीं.

Digitized by Google

घुष्, (इर्) १. प. अविशब्दने. शब्द न उच्चारतां निश्चय करणें. २ शब्द करणें. घोषति.

घूर्ण्, (अ) ६. प. घुण् (अ) पाहा. घूर्णति; घूर्णायमान.

घूर्ण्, (अ) १. आ. घुण् (अ) पाहा. घूर्णते; घूर्णि.

घृ, १. प. सेचने. शिंपणें. २ ओलाकरणें. घरति; घृणि.

घृ, ३. प. क्षरणदीप्त्योः. गाळणें, ओतणें. २ गळणें, टिबकणें. ३ प्रकाशितकरणें. जिघर्ति; घृत, घृणा.

घृ, १०. उ. प्रस्रवणे. वाहणें, पाघळणें. घारयति, घारयते; अभिघार.

घृण्, (इ) १. आ. घिण् पाहा. घृण्णते.

घृण्, (उं) ८. उ. दीप्तौ. प्रकाशणें, चमकणें. घर्णोति, घर्णुते

घृष्, (उ) १. प. संघर्षे. चोळणें, घासणें. २ दळणें. ३ कुटणें. घर्षति; घर्षण.

घ्रा, १. प. गंधोपादाने. वासघेणें, हुंगणें. जिघ्रति; घ्राण.

ङ.

ङु, (ङ्) १. आ. शब्दे. शब्दकरणें. ङवते.

च.

चक्, (अ) १. आ. तृप्तौ, प्रतीघाते. तृप्तहोणें. २ मागें हटवणें, पराभव करणें. चकते; चकोर.

चक्, (अ. म्) १. प. तृप्तौ. तृप्त—संतुष्ट होणें. चकति; चकित.

चकास्, (ऋ) २. प. दीप्तौ. प्रकाशणें, चमकणें. चकास्ति; चकासित.

चक्, (अ) १०. उ. व्यथने. दुखवणें. २ दुखणें. चक्कयति, चक्कयते.

Digitized by Google

चंच्, (उ) १. प. गत्यर्थे. जाणें. चंचति; चंचल.

†चट्, (ए) १. प. वर्षावरणयोः· वर्षणें, वृष्टिहोणें. २ वेष्टणें, गुंडाळणें. चटति.

चट्, (अ) १०. उ. भेदने. भेदकरणें, फोडणें. चाटयति, चाटयते; चटक.

चड्, (इ) १. आ. कोपने. रागावणें, कोपणें. चंडते; चंड.

चण्, (अ. म्) १. प. दाने, शब्दे. देणें, दानकरणें. २ वाजणें. चणति; चणक.

चत्, (एं) १. उ. याचने. याचना करणें, मागणें. चतति, चतते; चतुर.

चद्, (इ) १. प. आल्हादे, दीप्तौ. आनंद—संतोषपावणें, २ प्रकाशणें. चंदति; चंद्र, चंदन.

चद्, (एं) १. उ. चत् पाहा. चदति, चदते.

चन्, (अ. म्) १. प. हिंसायां. मारणें, हिंसाकरणें. चनति; चनस्.

चन्, (अ) १०. उ. श्रद्धोपहननयोः· विश्वास—श्रद्धा ठेवणें. २ उपद्रव—इजा देणें, मारणें. चानयति, चानयते.

चप्, (अ) १. प. सांत्वने. कुर्वाळणें, समजावणें, सांत्वनकरणें. चपति; चपेट.

चप्, (इ) १०. उ. गत्यां. जाणें. चंपयति, चंपयते; चंपति; चंपक.

चप्, (अ) १०. उ. परिकल्कने. दळणें. २ कुटणें. चपयति, चपयते.

चम्, (उ) १. प. अदने. खाणें, भक्षणें. चमति; आचमन.

चम्, (उ) ५. प. भक्षणे· खाणें. चमति; चमर.

चय्, (अ) १. आ. गतौ. जाणें. चयते.

* वेदांत मात्र आढळतो.

Digitized by Google

चर्, (अ) १. प. गतौ, भक्षणेच. जाणें. २ खाणें. चरति; चर, चरक, चरु.

चर्, (अ) १०. उ. संशये. संशय—संदेह येणें, चारयति, चारयते; चार.

चरण, ११. प. गतौ. जाणें, चालणें. चरण्यति.

चर्च्, (अ) १. प. परिभाषण हिंसातर्जनेषु. संवादकरणें, बोलणें. २ मारणें, हिंसाकरणें. ३ निंदाकरणें, रागेभरणें, दोषलावणें. चर्चति; चर्चा.

चर्च्, (अ) ६. प. परिभाषणभर्त्सनयोः. बोलणें, संवादकरणें. २ निंदाकरणें. चर्चति; चर्चा.

चर्च्, (अ) १०. उ. अध्ययने. अध्ययन—पठनकरणें. चर्चयति, चर्चयते; चर्चा.

चर्ब्, (अ) १. प. गतौ, अदनेच. जाणें. २ खाणें. ३ चावणें. चर्बति; चर्बण.

चल्, (अ. मृ) १. प. कंपने. कांपणें, चळणें. हालणें. चलति; चल, चंचल.

चल्, (अ) ६. प. विलसने. खेळणें, विलास—क्रीडा करणें. चलति.

चल्, (अ) १०. उ. भृतौ. पोसणें, वाढवणें, चालवणें. चालयति; चालक.

चष्, (अं) १. उ. भक्षणे. खाणें, पिणें. २ मारणें. चषति, चषते; चषक.

चह्, (अ) १. प. परिकल्कने, शाठ्ये. दुष्टपणाकरणें, फसवणें. २ दंभकरणें. ३ छळणें, कुटणें. चहति.

